Phone - 022 - 2270 8715
Phone - 022 - 2262 0172
E-mail - *dy.registrar.aau@gmail.com*

# University of Mumbai

**Academic Authority Unit,**
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G.Road,
Mumbai – 400 032

Ref. No.: AA / ICD / 2017 – 18 /

Date : 05 / 05 / 2017

**विषय : पी.एचडी प्रवेश परीक्षेबाबत..**

सर्व परीक्षा केंद्रांचे संचालक/प्राचार्य तसेच सर्व विद्यार्थी यांच्या माहितीस्तव कळविण्यात येते की,

१. पीएच.डी प्रवेश परीक्षा शनिवार दि. ०६ मे, २०१७ रोजी दुपारी २.०० ते ५.०० या दरम्यान संबंधित परीक्षा केंद्रावर संपन्न होणार आहे.

२. परीक्षा केंद्रनिहाय विद्यार्थ्यांची यादी व प्रवेशपत्र विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी सदर यादी तपासून आपआपला बैठक क्रमांक व परीक्षा केंद्र नोंद करुन घेणे.

३. विद्यार्थ्यांनी प्रवेश पत्र डाऊनलोड करुन त्याची प्रत व सोबत पॅन कार्ड / आधार कार्ड / वाहन चालक परवाना किंवा फोटो असलेले शासकीय ओळख पत्र सोबत घेऊन संबंधित परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी वेळेत उपस्थित रहावयाचे आहे. ४. विद्यार्थ्यांना प्रवेश पत्र काही कारणास्तव डाऊनलोड न करता आल्यास त्यांनी त्यांच्या परीक्षा अर्जाची प्रत व सोबत पॅन कार्ड / आधार कार्ड / वाहन चालक परवाना किंवा फोटो असलेले शासकीय ओळख पत्र सोबत घेऊन संबंधित परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित झाल्यास परीक्षा केंद्रांचे संचालक/प्राचार्य यांनी अशा विद्यार्थ्याला परीक्षेस बसू द्यावे.

५. विद्यार्थ्यांना त्यांचे परीक्षा अर्ज व शुल्क विद्यापीठास ऑनलाईन प्रक्रियेद्वारे भरले असूनही काही कारणास्तव त्यांचे नाव यादीत उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांच्या परीक्षा अर्जाची प्रत व सोबत पॅन कार्ड / आधार कार्ड / वाहन चालक परवाना किंवा फोटो असलेले शासकीय ओळख पत्र सोबत घेऊन विद्यापीठाच्या कलिना कॅम्पस, सांताक्रुझ पुर्व येथिल आयडॉल या परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित झाल्यास परीक्षा केंद्रांचे संचालक / प्राचार्य यांनी अशा विद्यार्थ्याला परीक्षेस बसू द्यावे. अशा विद्यार्थ्याचे नाव यादीमध्ये सगळयात शेवटी असलेल्या Dummy रांगेत नोंद करुन त्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागास कळवावी.

६. परीक्षा केंद्रांचे संचालक/प्राचार्य यांच्या सुलभ सोईसाठी सोबत देयकाचा नमुना जोडला आहे. सदर देयकांमध्ये रक्कम भरुन सही शिक्क्यानिशी विद्यापीठास पाठविण्यात यावी. जेणेकरुन आपणास सदर प्रवेश परीक्षेचे मानधन अदा करण्यात येईल.

७. प्रवेश परीक्षेबाबत काही शंका असल्यास किंवा काही विचारणा करावयाची असल्यास दुरध्वनी क्रमांक ०२२ - २६५४३४७९ यावर संपर्क करावा.

उपकुलसचिव - प्रबंध विभाग